www.ecourtsindia.com



**निशाणी क्र. १०/क**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर जबाब**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | **मोहम्मद नईम मोहम्मद साबिर, (फिर्यादी)** |
| वय | – | ४२ वर्ष, धंदा – ऑटो चालक, |
| राहणार | – | जुनी वस्ती बडनेरा, ता. जि. अमरावती. |

------------------------------------------------------------

**सरतपास सरकारतर्फे श्रीमती आर.जी. हाडे, सरकारी वकील**

(१) घटना सकाळी ०९.३० ते १०.०० वाजता सन २०१६ मध्ये सातुर्ना पेट्रोलपंपाजवळ घडली होती. मी बडनेऱ्यावरुन अमरावतीकडे ऑटोमधून सवारी घेवून येत होतो. माइया ऑटोचा क्र. एम.एफ.२७.ए.एफ.२७१९ हा होता. एफ.ए. लोडींग ऑटो हा ड्रायव्हर साईडने येवून मला धडक मारली. धडक लागल्यामुळे माझ्या दोन सवाऱ्यांना मार लागला. पोलीस आले व आम्हाला राजापेठ पोलीस ठाणे येथे घेवून गेले. ज्या ऑटोने धडक दिली होती त्या ऑटोचा क्रमांक मला आठवत नाही. घटना सन २०१६ ची असल्यामुळे मला क्रमांक आठवत नाही. मी रिपोर्ट देतांना ऑटोचा क्रमांक दिला होता. मला धडक दिलेल्या ऑटो चालकाचा चेहरा आठवत नाही.

(२) आता साक्षीदारास जबानी रिपोर्ट दाखविण्यात आला. तो हाच आहे. त्याखाली माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येत आहे. आता साक्षीदारास छापिल प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. तो हाच आहे. त्याखाली माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येत आहे. मी आरोपीला ओळखत नाही. (आरोपी कोर्टात हजर आहे).



This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030046642017-orderno-1.pdf

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस.एस. थोरात, विधीज्ञ** :–

**उलटतपास नाकारला.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्विकृत

**(अ. भा. कट्टे)**
दिनांक : १७.०२.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र. १०, अमरावती.



This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030046642017-orderno-1.pdf

www.ecourtsindia.com